आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता
१९ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साही वातावरणात साजरी

- गेल्या वर्षी नैसर्गिक संकटांचा फटका बसलेल्या ५ राज्यांना केंद्र सरकारकडून एक हजार ५५४ कोटी रुपयांहून जास्त अर्थसहाय्य मंजूर

- दहशतवादाविरुद्ध लढण्यात आघाडीवर असल्याचा पाकिस्तानचा दावा म्हणजे विडंबना असल्याचं भारताचं संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत निवेदन

- नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात

**आणि**

- ज्येष्ठ क्रिकेटपटू आणि मार्गदर्शक  मिलिंद रेगे यांचं निधन

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साहात वातावरणात साजरी होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी भव्य मिरवणुका, शोभायात्रा, व्याख्यानं, चित्र आणि शस्त्र प्रदर्शनं इत्यादी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मिरवणुका आणि पदयात्रांमधे शिवकाळ साकारणाऱ्या वेशभूषा तसंच कसरत करतब दाखवणाऱ्या कवायती लक्ष वेधून घेत आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराज यांच्या कार्यातून एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून व्यक्त केली आहे.

नवी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर शिवजयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ठिकठिकाणी जय शिवाजी - जय भारत पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं असून त्यात युवावर्ग मोठ्या संख्येने सहभागी होत आहे. राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी मुंबईत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं.

शिवाजी महाराजांचं जन्मस्थळ किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. पुण्यात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जय शिवाजी - जय भारत पदयात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पराक्रमी राजा तसंच उत्कृष्ट शासक आणि व्यवस्थापन गुरु होते, असं फडणवीस यावेळी म्हणाले....

**होल्ड – बाईट - फडणवीस**

**<><><><><>**

गेल्यावर्षी पूर,भूस्खलन, वादळे यांसारख्या नैसर्गिक संकटांना सामोरं जावं लागलेल्या पाच राज्यांना एक हजार ५५४ कोटी रुपयांहून अधिक मदत केंद्र सरकारनं मंजूर केली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय समितीनं ही मंजूर दिली असून हा निधी राष्ट्रीय आपत्ती निवारण कोष- NDRF च्या माध्यमातून दिला जाणार आहे.

आंध्र प्रदेशला ६०८ कोटी रुपये, नागालँडला १७० कोटी रुपये ओदिशासाठी  २५५ कोटी रुपये, तेलंगणासाठी २३१ कोटी रुपये, तर त्रिपुरा राज्यासाठी २८८ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचं गृहमंत्रालयानं सांगितलं.

ही अतिरीक्त मदत केंद्रानं याआधी त्या राज्यांना दिलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या व्यतिरीक्त असल्याचंही गृहमंत्रालयानं सांगितलं.

**<><><><><>**

ग्रामीण भागातल्या रहिवाशांचं जीवन सुखकर करण्यासाठी केंद्रसरकारने विविध उपाययोजन केल्या असल्याचं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं आहे. आफ्रिकन – आशियाई ग्रामविकास संघटनेच्या कार्यकारिणीच्या आज नवी दिल्लीत आयोजित बैठकीत ते बोलत होते. मनरेगा, प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजना, एक पेड मां के नाम, लखपती दीदी योजना अशा अनेक कल्याणकारी योजनांचा उल्लेख त्यांनी केला.

**<><><><><>**

गेल्या वर्षीच्या ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत शहरी भागातील १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटाच्या बेरोजगारीच्या दरात ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची घट झाली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या डिसेंबर तिमाहीत बेरोजगारीचा दर ६ पूर्णांक ५ दशांश टक्के होता.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेतल्या भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक आज संध्याकाळी नवी दिल्लीत होणार आहे. पक्षाचे नवनिर्वाचित आमदार आणि वरिष्ठ नेते यात सहभागी होतील. दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्याचं नाव या बैठकीतच ठरवलं जाईल, नव्या मुख्यमंत्र्याचा शपथविधी सोहळा उद्या रामलीला मैदानावर होणार आहे.

**<><><><><>**

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांनी आज पदभार स्वीकारला. राजीव कुमार यांचा निवडणूक आयोगाच्या प्रमुखपदाचा कार्यकाळ

संपल्यामुळे ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली. ज्ञानेश कुमार यांनी यापूर्वी संसदीय कामकाज मंत्रालयात सचिवपदाची जबाबदारी सांभाळली होती.

<><><><><>

दहशतवादाविरुद्ध लढण्यात इस्लामाबाद आघाडीवर असल्याचा पाकिस्तानचा दावा म्हणजे विडंबना आहे, असं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताचे स्थायी प्रतिनिधी पर्वतनेनी हरिश यांनी काल म्हटलं. संयुक्त राष्ट्रांनी सूचिबद्ध केलेल्या २०हून अधिक दहशतवादी संघटनांना आश्रय देणारा पाकिस्तान हा जागतिक दहशतवादाचं केंद्र आहे. त्यामुळे असा देश जेव्हा दहशतवादाविरुद्ध आघाडीवर असल्याचा दावा करतो, तेव्हा ती एक विडंबना ठरते, असंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

सुरक्षा परिषदेमधे सुधारणा करण्याबाबत व्यापक सहमती घडवून आणावी असं आवाहन संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँतोनियो गुटेरस यांनी केलं. सुरक्षा परिषदेच्या बैठकीत ते बोलत होते. परिषदेमधे ८० च्या दशकाचं नव्हे तर आजचं प्रतिबिंब पडलायला हवं असं सांगत, परिषदेचा विस्तार करण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. युनायटिंग फॉर सेन्सस नावानं ओळखल्या जाणाऱ्या देशांच्या गटाने सुधारणांची अमलबजावणी न केल्यानं आंतरशासकीय वाटाघाटी अयशस्वी ठरल्याचं गुटेरस म्हणाले.

<><><><><>

९व्या फ्लॅगशिप एशिया इकॉनॉमिक डायलॉगला २० फेब्रुवारी पासून पुण्यात सुरुवात होणार आहे. यात कृत्रिम बुद्धीमत्ता आणि ऑटोमेशन तसंच वातावरण बदलाचा जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम या विषयावर सखोल चर्चा

होणार आहे. या कार्यक्रमात भारत आणि जगभरातले राजकीय नेते, वरिष्ठ सनदी अधिकारी, धोरण कर्ते, उद्योग तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ सहभागी होणार आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे.  २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान हा कार्यक्रम होणार आहे. फ्रॅगमेंटशन युगातली आर्थिक लवचिकता आणि पुरुत्थान ही यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. पाकिस्तान आणि दुबईत या स्पर्धेतले सामने होणार असून, आज पहिला सामना कराची इथं पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघादरम्यान होणार आहे. दुपारी अडीच वाजता सामन्याला सुरुवात होईल. रोहीत शर्माच्या नेतृत्वातल्या भारतीय संघाचा पहिला सामना उद्या दुबईत बांग्लादेशविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

सातवे स्पोर्टस्टार एसेस पुरस्कार मुंबईत नुकतेच प्रदान करण्यात आले. यात विविध क्रीडा प्रकारातल्या खेळाडूंना सन्मानित करण्यात आलं. माजी हॉकी गोलकिपर पी आर श्रीजेश याला पुरुष स्पोर्टस्टार ऑफ द इयर तर मनु भाकर हिला महिला स्पोर्टस्टार ऑफ द इयर पुरस्कारानं गौरवण्यात आलं. बुडापेस्ट बुद्धीबळ ऑलिम्पियाड स्पर्धेतले विजेते पुरुष आणि महिला संघ संयुक्तपणे नॅशलन टीम ऑफ द इयर पुरस्काराचे मानकरी ठरले. बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू हिला इन्स्पिरेशन आयकॉन पुरस्कार तर आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांना स्पेशल रिकग्नेशन गेम चेंजर अवॉर्ड दिला गेला. महाराष्ट्राचे स्वप्निल कुसाळे आणि दिव्या देशमुख यांना स्पोर्ट्समन आणि स्पोर्ट्सवुमन ऑफ द इयर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३०वाजता
१९ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<><><><><>**

मुंबई क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि मार्गदर्शक  मिलिंद रेगे यांचं आज हृदयविकाराच्या झटक्यानं मुंबईच्या खासगी रुग्णालयात निधन झालं. ते ७६ वर्षांचे होते. गेल्या रविवारी रेगे यांना रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केलं होतं.

मुंबई संघात अष्टपैलू खेळाडू म्हणून मिलिंद रेगे यांची ओळख होती. प्रथम श्रेणीतले ५२ सामने खेळणाऱ्या रेगे यांनी १२६ गडी  बाद केले होते. १९७० मध्ये मिलिंद रेगे यांनी मुंबई रणजी संघाचं कर्णधारपद भूषविलं होते. निवृत्तीनंतर रेगे यांनी मुंबई क्रिकेट संघटना- MCA चे  निवड समितीत सदस्य, मार्गदर्शक आणि निवड समितीचे अध्यक्ष अशा विविध पदांवर काम केलं होते. त्यांच्याच कार्यकाळात रणजीसाठी मुंबईच्या संघात सचिन तेंडुलकर याला प्रथम संधी मिळाली होती.

**//<><><><><>//**